# शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,जळगांव

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

दुरध्वनी क्र.०२५७-२२८१५२२ फॅक्स क्र.०२५७-२२८१३१९

Email-princoej/@rediffmail.com website:www.gcoej.ac.in

जा.क्र.शाअमज/प्रथमवर्ष प्रवेश/२०२१-२२/१९५१ दिनांक-३०/११/२०२१

## शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता प्रथम वर्ष /थेट दुसरे वर्ष बी.टेक प्रवेशाबाबतची माहिती

या महाविदयालयात शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये प्रथम वर्ष बी.टेक च्या सर्व शाखा अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या सर्व विदयार्थ्यांना तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांच्या सुचनेप्रमाणे प्रथम वर्षा करीता दिनांक ०४/१२/२०२१ ते ०७/१२/२०२१ व थेट दुसऱ्या वर्षा करीता दिनांक ०३/१२/२०२१ ते ०५/१२/२०२१ या कालावधीतच आपला प्रवेश या संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहून अंतिमरित्या निश्चित करावयाचा आहे.

**महाविद्यालय नियमित सुरू होणेबाबतची सुचना संस्थेच्या संकेत स्थळावर प्रसिदध करण्यात येईल.**

**प्रवेश निश्चित करणा-या विदयार्थ्यांकरिता महाविदयालयातील प्रवेशाबाबतची कार्यवाही ही खालील पदधतीने पुर्ण करावयाची आहे.**

१ महाविदयालयाच्या संकेतस्थळावर(https://www.gcoej.ac.in) दर्शविलेल्या Academics-Fees information-Fee Structure मध्ये नमुद केल्याप्रमाणे विद्यार्थी ज्या संवर्गात आहे त्या संवर्गासमोर दर्शविलेली शेवटच्या रकान्यातील फी काळजीपुर्वक वाचुन सदरची फी Online भरणेकरिता State Bank of India Online (onlinesbi.com) येथे State Bank Collect ला जाउन Proceed करावे त्यापुढे State of Corporate/Institution मध्ये Maharashtra घेवुन Type of Corporate/Institution मध्ये Educational Institutions घेवुन Go करून पुढे जावे. त्यानंतर पुढील पानावर Educational Institutions Name मधे Principal Govt.College of Engg.Jalgaon Select करून Submit करावे व पुढील ऑनलाईन फि भरण्याची प्रक्रिया पुर्ण करावी. **ऑनलाईन फी भरणेच्या प्रक्रियेत** DTE Mumbai यांचेकडुन प्राप्त झालेल्या Allotment Letter वरील EN ने सुरवात झालेला नंबर संपूर्णपणे नमुद केल्यावर पुढील प्रक्रिया पार पाडावी,**तदनंतर विदयार्थ्यांनी ऑनलाईन फी भरल्याची प्रिंट महाविदयालयात प्रवेश घेतेवेळी सोबत आणावी.**

२ प्रथम/थेट द्वितीय वर्ष बी टेक करिता आवश्यक असलेला प्रवेश अर्ज हा महाविदयालयात उपलब्ध करुन दिला जाईल तरी विदयार्थ्यांनी प्रवेश अर्ज संपूर्णरित्या भरुन खाली नमुद केलेल्या प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स प्रती दिलेल्या क्रमानेच प्रवेशअर्जास जोडुन प्रवेश अर्ज तयार करुन ठेवावा. तदनंतर मुख्य इमारतीच्या बाजुला असलेल्या वाचनालयाच्या हॉलमध्ये प्रवेशाची संपुर्ण कार्यवाही दिलेल्या सुचनेप्रमाणे करणे,त्याचठिकाणी विदयार्थ्यास कोणती फी सवलत लागु राहील याबाबत संबंधित मार्गदर्शन करतील.

**विद्यार्थ्यांना फी सवलतीबाबत कार्यालयाकडुन वेळोवेळी लावण्यात येणा-या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील. अन्यथा विदयार्थ्यास नियमानुसार खुल्या प्रवर्गास लागु असलेले संपुर्ण शुल्क भरुन दयावे लागेल याची नोंद घ्यावी.**

01) Allotment Letter and Seat acceptance acknowledgement (issued by ARC)
02) Leaving Certificate / Transfer Certificate.
03) MHT-CET 2020 Score card and $10^{th}$ and $12^{th}$ mark sheet
04) Caste Certificate and Caste Validity (All Reserved Category )
05) Non creamy layer certificate (OBC/ VJNT / SBC)(valid upto $31^{st}$ March 2022)
06) Domicile Certificate and Nationality Certificate
07) Gap certificate (if required)
08) Migration certificate (other than North Maharashtra University)
09) Passport size Photo 05 Nos

10) Bank Passbook Zerox {First Page}

11) Income Certificate for 2020-21 **Xerox Copy** (संपूर्ण ४ वर्षाचा अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत लागु राहील.)

12) Adhar Card Zerox

**13) All Original Document scanned copies in a Pen Drive (Soft Copy)**

३ वरील यादीतील सर्व मुळ कागदपत्रे महाविदयालयाकडे जमा केल्यानंतर महाविदयालयाकडून पात्रतेबाबतची पुढील संपूर्ण कार्यवाही होईपर्यंत जमा राहतील, विशेषतः अनु.क्र. ०२ ते ०८ चे मुळ प्रमाणपत्रे हे महाविदयालयात ठेवण्यांत येणार असल्यामुळे विदयार्थ्यांनी सदर प्रमाणपत्रांच्या आपल्या आवश्यकतेनुसार पुरेशा प्रती काढून आपल्याजवळ ठेवाव्यात. मुळ प्रमाणपत्र एकदा महाविदयालयात जमा केल्यावर कोणत्याही सबबीवर विदयार्थ्यास परत झेरॉक्स काढणेकरिता मिळणार नाही.तसेच प्रवेशाचे वेळी महाविदयालयाकडुन /बॅंकेकडुन फी भरलेल्या संपुर्ण पावतींचे अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत जतन करुन ठेवणे आवश्यक आहे,अन्यथा महाविदयालय सोडतेवेळी दाखला प्राप्त करुन घेण्यास तसेच सुरक्षा अनामत ठेव (Caution Money Deposit) प्राप्त करुन घेण्यास अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४ अनुक्रमांक १० करिता. विदयार्थ्याचे यापुर्वीच बॅंकेत खाते असेल तर त्या बॅंक खात्याच्या पासबुकची छायांकित प्रत जोडावी,जर बॅंक खाते नसेल तर विदयार्थ्याने प्रवेश निश्चित केल्यानंतर त्वरित स्थानिक स्टेट बॅंक शाखा,शिव कॉलनी,जळगांव येथे खाते उघडुन घ्यावे व बॅंक खात्याच्या पासबुकची छायांकित प्रत जमा करावी.

५. तदनंतर विदयार्थ्याचा प्रवेश Online Confirmed करण्यांत येउन प्रवेश अंतिमरित्या निश्चित होईल.

६ वर नमुद केलेली संपुर्ण प्रक्रिया पार पडल्यानंतर विदयार्थ्यास स्वत: प्रवेश हॉल मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या संगणकावर आपली स्वत:ची वैयक्तिक,शैक्षणिक माहिती ऑनलाईन भरावी.तसेच प्रवेश हॉलमध्ये ग्रंथालय व आयकार्डबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत आवश्यक ती माहिती देण्यांत येईल व त्याच दिवशी विदयार्थ्यास वसतिगृहाकरिता प्रवेश घ्यावयाचा असेल तर वसतिगृहाच्या प्रवेशाबाबतची कार्यवाही प्रवेशाचे ठिकाणी उपलब्ध करुन दिली जाईल.

टिपः- प्रवेश निश्चिती साठी येतांना विद्यार्थ्यांनी प्रवेश केंद्रावर तोंडावर मास्क लावणे व सामाजिक अंतर राखणे बंधनकारक राहील.

(डॉ. जी.एम.माळवटकर)
प्राचार्य
शासकीय अभि.महाविदयालय,जळगांव

प्रत- १.प्रथम वर्ष प्रवेश समिती अध्यक्ष यांचे माहितीस्तव

२.प्रथम वर्ष रिपोर्टिंग समिती अध्यक्ष( प्रा. एस. डी. अहीरराव, सहा. प्राध्यापक ) यांचे माहिती व पुढील कार्यवाहीस्तव

३ फी सवलत विभाग,कार्यालय यांचे माहिती व पुढील कार्यवाहीस्तव (विद्यार्थी विभाग)

२/-त्यांना कळविण्यात येते की,त्यांनी विदयार्थ्यास त्याच्या जातीच्या संवर्गानुसार तसेच पालकांचे २०२०.२१ च्या उत्पन्नानुसार लागु असलेली फी त्याच्या प्रवेश अर्जावर नमुद करुन विदयार्थ्यास त्याप्रमाणे मार्गदर्शन करणे.

४. रोखपाल विभाग यांचे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी (श्री कुलकर्णी/श्री तडवी)

२/-त्यांना कळविण्यांत येते की,त्यांनी विदयार्थी विभागाकडुन जाहिर केलेल्या Fee Structure प्रमाणे ऑन लाईन फी भरणेबाबत आवश्यक ते बदल संबंधितांकडुन करुन घ्यावे, तसेच विदयार्थ्याच्या प्रवेश अर्जावर नमुद केल्याप्रमाणे ऑन लाईन फी भरलेली आहे किंवा नाही याबाबतची रोजच्या रोज तपासणी करुन फी भरल्याबाबतची नोंद विदयार्थ्याच्या प्रवेश अर्जावर करण्यात यावी. व त्याचा स्वतंत्र अभिलेख ठेवण्यात यावा.

५. प्रबंधक,शासकीय अभि.महाविदयालय,जळगांव यांचे माहितीसाठी.

६. श्री आर.ए.दळवी,डाटा एन्ट्रीऑपरेटर यांना महाविदयालयाचे संकेतस्थळावर अपलोड करणेकरिता.